|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

व्याख्याता मान्यता विभाग

जा.क्र. कबचौ उमवि/१८/८०५/२०२४ दि. ०२/०५/२०२४ ०३

<u>अत्यंत महत्वाचे</u>

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य व परिसंस्थेचे मा. संचालक यांना. . .

विषय :- प्राचार्य/संचालक पदासाठी प्राप्त अर्जांची छाननी करण्यासाठी आवश्यक बाबी, अटी, शर्ती व पात्रता इ. साठी नियमावली बाबत.

संदर्भ :- १) मा. व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्र. व्य.प.ए.- ३१/२०२४ दि. ११.०३.२०२४
२) मा. विद्या परिषद ठराव क्र. वि.प.ए.-६५/२०२४ दि. १५.०३.२०२४

महोदय/महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.), नवी दिल्ली, ए.आय.सी.टी.ई, नवी दिल्ली, फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, एन.सी.टी.ई., नवी दिल्ली व शासनाने निर्गमीत केलेल्या अधिसूचना, निर्णय तसेच विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमतील केलेले परिपत्रकानुसार कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयात/ परिसंस्थेत प्राचार्य/संचालक पदासाठी संस्थेकडून तज्ञ समिती नियुक्त करुन अर्जांची छाननी केली जाते. छाननीत पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येते. प्राचार्य संचालक / पदासाठी प्राप्त अर्जाची छाननी कोणी करावी, अर्जा सोबत कोणकोणते दस्ताऐवज जोडणे आवश्यक आहे; अर्ज कोणामार्फत अग्रेषित करावे (Application Forwading) याबाबत युजीसी, शासन निर्णय, परिपत्रकात स्पष्टता दिसून येत नाही. विद्यापीठाच्या दि. ०३/०९/२०१९ रोजी निर्गमीत केलेल्या नियमावली मध्ये याबाबत स्पष्टता दिसून येत नाही. तसेच मा. वि. प. ठराव क्र. ७३/२०१३ च्या अनुषंगाने दि. १७/०६/२०१३ रोजीचे निर्गमित पत्र युजीसी व शासनाच्या नवीन नियमावलीमूळे कालबाह्य झालेले आहे. त्यामूळे सदर पत्र रद्द करणे सुध्दा आवश्यक आहे.

उपरोक्त बाब लक्षात घेता, मा. कुलगुरु महोदयांच्या निर्देशानुसार प्रा. डॉ. एस. टी. भूकन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियूक्त करण्यात आली. सदर समितीने शिफारसी विद्यापीठास सादर करुन त्यासंदर्भात नियमावली तयार करुन दिलेली आहे. समितीने केलेल्या शिफारसीच्या अनुषंगाने नियमावलीस मा. व्यावस्थापन परिषद आणि मा. विद्या परिषदेच्या सभेत मान्यतेसाठी ठेवण्यात आले असता त्यास संदर्भीय १ व २ च्या ठरावानुसार समितीच्या अहवालात स्पष्टता आणण्याच्या अधिन राहून त्या-त्या प्राधिकरणाने मान्यता देण्यात आलेली आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, मा. विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार प्राचार्य / संचालक या पदासाठी प्राप्त अर्जाची छाननी करतांना सोबत जोडलेल्या नियमावली प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. सदर नियमावलीनुसार कार्यवाही न केल्यास किंवा त्यासंदर्भात विद्यापीठाकडे तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संस्थेची व प्राचार्य/ संचालक यांची राहिल यांची कृपया नोंद घ्यावी. सदर नियमावली निवड समितीच्या वेळी मा. कुलगुरु नामनिर्देशित सदस्य व विज्ञयतज्ञ व मागासवर्गीय प्रतिनिधी सदस्यांना व अध्यक्षांना निर्दशास आणून दयावे. सदर नियमावली विद्यापीठाच्या <u>www.nmu.ac.in</u> या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

--२--

उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र. : ०२५७-२२५७२७६, २२५७२७७ फॅक्स क्र. : ०२५७-२२५८४०३, ४०६,
Umavinagar, Jalgaon Tel Nos. : 0257-2257276 to 2257277, Fax Nos.:0257-2258403, 406
<u>Web</u> : www.nmu.ac.in <u>E-mail</u> : registrar@nmu.ac.in & dr-approval@nmu.ac.in

सदर नियमावली हे पत्र निर्गमीत झाल्यापासून लागू राहिल. तसेच यापूर्वी निर्गमीत करण्यात आलेले विद्यापीठ पत्र जा.क्र. उमवि/१८/प्राचार्य निवड प्रकियेबाबत/७३२/२०१३ दि. १७/०६/२०१३ रद्द समजण्यात यावे. सदर पत्र मा. विद्यापरिषद आणि मा. व्यवस्थापन परिषदेच्या अंतीम मान्यतेच्या अधिन राहून निर्गमीत करण्यात येत आहे. तरी कृपया, वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, सदर पत्र संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

उप कुलसचिव
(व्याख्याता मान्यता विभाग)

सोबत : १) नियमावली २) ना हरकत प्रमाणपत्र नमुना ३) अर्ज छाननी तक्ता

प्रत - माहिती व कार्यवाहीसाठी सादर.
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचेशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे मा. अध्यक्ष/सचिव यांना माहितीस्तव सविनय सादर.

प्रत - १) मा. कुलगुरु कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव
२) मा. प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव
३) मा. कुलसचिव कार्यालय, कबचौ उमवि, जळगाव
४) मा. व्यवस्थापन परिषदेचे सर्व सदस्य यांना.

प्राचार्य/संचालक पदासाठी प्राप्त अर्जांची छाननी करण्यासाठी आवश्यक बाबी, निकष, अटी, शर्ती व पात्रता इ. साठी सुस्पष्ट नियमावली :

०१) विद्यापीठाने जाहिरातीस मान्यता दिली आहे याची खातरजमा करावी. जाहिरातीत नमूद असलेल्या सर्व अटी व शर्तींचे सर्व सदस्यांनी काटेकोरपणे अवलोकन करून अंमलबजावणी करावी.

०२) छाननी सुरु करण्यापूर्वी संस्थेने प्राचार्य/संचालक या पदाची जाहिरात विस्तृत (**Wide Publicity**) प्रमाणावर प्रसिध्द केली आहे याची खात्री करावी. राष्ट्रीय-१, राज्य-२, व स्थानिक- २, वृत्तपत्रात तसेच महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात आली आहे काय याची खातरजमा करावी.

०३) प्राचार्य / संचालक पदाच्या मुलाखतीसाठी संस्थेकडे एकूण किती उमेदवारांनी अर्ज केले आहेत ? त्यापैकी किती उमेदवार हे युजीसी/शासन निर्णयात नमूद सर्व शैक्षणिक अर्हता धारण करणारे आहेत याची खात्री करावी.

०४) प्राचार्य/संचालक पदासाठी अर्ज केलेल्या (कबचौउमवि कार्यकक्षेच्या आतील आणि बाहेरील) अशा सर्व उमेदवारांनी अर्ज केलेला असल्यास त्यांनी कबचौउमविचा (**Academic Research Score**) प्रमाणपत्र हे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचे असल्याबातची खात्री करावी.

०५) शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांची शिफारस करण्यात येवू नये.

०६) मागासवर्गिय उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र तसेच जात वैधता प्रमाणपत्र योग्य त्या नमुन्यात सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले आहेत किवा नाहीत याची खातरजमा करावी.

०७) इतर मागासवर्गिय, भटक्या जाती व जमाती व तत्सम उमेदवारांना जातीच्या दाखल्यात ते प्रगत व उन्नत गटात (**Creamy Leyer**) मोडत नसल्याचा उल्लेख तपासावा.

०८) प्राचार्य/संचालक पदासाठी अर्ज हा विहित मार्गाने (**Proper Channel**) करणे आवश्यक आहे. म्हणजेच संस्थेच्या लेटरहेडवर ना हरकत प्रमाणपत्र जोडून संस्थेने अग्रेषित केलेला असावा.

०९) अर्ज आणि ना हरकत प्रमाणपत्र ज्या ठिकाणी अर्ज करावयाचा आहे त्या संस्थेच्या सक्षम प्राधिकाऱ्यास अग्रेषित करावा.

१०) अर्ज आणि ना हरकत प्रमाणपत्र जाहिरात प्रकाशित झालेल्या दिवसाचा किंवा त्यानंतरच्या तारखेचा असावा. अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेच्या आतील असावे; जाहिरात प्रकाशित होण्यापूर्वीचे नसावे.

११) अर्जा सोबत सर्व शैक्षणिक, व्यावसायिक अर्हता प्राप्त कागदपत्रांच्यासह स्वसाक्षांकित प्रती पृष्ठ क्रमांकासह असाव्यात. एकूण पृष्ठ संख्या अर्जात नमूद असावी.

१२) अर्जा सोबत ना हरकत प्रमाणपत्राची मूळ प्रत जोडलेली असावी.

१३) अग्रेषित पत्रावर जावक क्रमांक आणि दिनांक संस्थेच्या लेटरहेडवर अध्यक्ष/सचिव यांच्या स्वाक्षरीचे असावे.

१४) अर्जासोबत API/ARS प्रमाणपत्र हे कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे जोडणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र हे प्राचार्य पदासाठी API/ARS किमान ११० पेक्षा जास्त असा उल्लेख केलेले असल्याबाबत खात्री करावी. प्रमाणपत्र नसेल तर अर्ज अपात्र ठरवावा.

(कृ.मा.प.)

१५) अर्जासोबत दस्ताऐवजांची खालीलप्रमाणे अनुक्रमणिका ही पृष्ठ क्रमांकासह असावी.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ०१ | | |
| ०२ | | |

१६) अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापर्यत उमेदवाराने आवश्यक शैक्षणिक आणि व्यावसायिक अर्हता धारण केली असल्याची खात्री करुन घ्यावी.

१७) संस्थेने जाहिरातीनुसार शैक्षणिक अर्हता धारक उमेदवारांना मुलाखत पत्र निर्गमित करावे.

१८) उमेदवाराचा अर्ज ई-मेलव्दारे प्राप्त झाल्यास तो स्विकारण्यात येवू नये. तसेच अंतिम तारखेनंतर प्राप्त अर्ज स्विकरण्यात येवू नये. तसेच अंतिम तारखेनंतरचे टपालामुळे विलंब झालेले अर्ज स्विकारण्यात येवू नये. टपाली अर्ज मुदतीपूर्व प्राप्त होणे आवश्यक आहे.

१९) प्राचार्य पदासाठी आवश्यक असलेले किमान अध्यापन अनुभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्राचार्य उमेदवार असेल तर संस्थेचे अध्यक्ष/सचिव यांचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र असावे. शिक्षक उमेदवार असेल तर प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र असावे.

२०) सदर नियमावली संस्थाचालक, उमेदवार, छाननी समिती आणि सर्व संबंधितांना ज्ञात करुन देण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

२१) सदर छाननी समितीमध्ये किमान एक सदस्य प्राचार्य किंवा प्राध्यापक बहि:स्थ महाविद्यालयातील असावा आणि अर्ज छाननी समिती सदस्यांचा प्रवास खर्च आणि दैनिक भत्ता विद्यापीठ नियमा नुसार संबंधित संस्थेने त्याच दिवशी अदा करावा.

दिनांक:- / /२०

# प्राचार्य पदासाठी प्राप्त अर्जाची छाननी तक्ता

संस्थेचे नाव :-------------------------------------------------------

महाविद्यालयाचे नाव :---------------------------------------------------

| अ.क्र. | अर्ज कर्त्याचे पुर्ण नाव व पत्ता | जन्म तारीख | प्रवर्ग | शैक्षणिक अर्हता व शे. गुण | | व्यावसायीक अर्हता व शे. गुण | | नेट/सेट वर्ष/विषय | पीएच.डी. विषय आणि नोटीफिकेशन दिनांक | सहयोगी प्राध्यापक/ प्राचार्य मान्यता पत्र क्र. | प्राचार्य API /ARS प्रमाणपत्र पत्र क्र. | ना. हरकत प्रमाणपत्र | सध्या कार्यरत महाविद्यालय | प्रॉपर चॅनेल अर्ज आहे काय | संस्थेकडे अर्ज प्राप्त दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | UG | PG | UG | PG | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | |

समिती सदस्य
नाव व स्वाक्षरी
दिनांक

समिती सदस्य
नाव व स्वाक्षरी
दिनांक

समिती सदस्य
नाव व स्वाक्षरी
दिनांक

समिती अध्यक्ष
नाव व स्वाक्षरी
दिनांक

## ना हरकत प्रमाणपत्र

(संस्थेच्या/परिसंस्थेच्या लेटर हेडवर असणे आवश्यक आहे.)

प्रमाणित करण्यात येते की, श्री. / श्रीमती /डॉ. /सहायक प्राध्यापक /प्राध्यापक ____________________ हे आमच्या परिसंस्थेत/महाविद्यालयात ____________ या पदावर कार्यरत असून, त्यांनी ______________ या पदासाठी जाहिरात क्र.__________ दि. / /२० नुसार आवेदन पत्र (अर्ज) सादर केलेला आहे. त्यांनी वरील पदासाठी केलेल्या आवेदन पत्रास (अर्जास) आमच्या संस्थेची /परिसंस्थेची/महाविद्यालयाची कोणतीही हरकत नाही.

____________________ यांची आपल्या महाविद्यालयात वरील पदासाठी निर्धारित कालावधीकरीता निवड झाल्यास त्यांना कार्यमुक्त करण्यास आम्ही तयार आहोत.

अध्यक्ष सचिव